Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in
शिव सहायता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र
**Dr. S. M. Gaikwad**
**Coordinator, Shiv-Sahayata**
**& Disaster Management Center**
**Phone – (0231) 2609176**
**Email: ssdmc@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/शिव—सहायता/१०८३ दि. ०१/०३/२०२४

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : शिव सहायता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापनावर आधारीत एक दिवसीय प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यशाळेस २ मुले, २ मुली, १ शिक्षक यांना उपस्थित राहणेविषयी.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठातील शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या वतीने वेळोवेळी आपत्ती व्यवस्थापनाशी निगडित कार्यक्रम, उपक्रम, प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजित करणेत येतात. सद्यस्थितीत विद्यापीठ अंतर्गत शिव सहायता आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील सर्व अधिविभागासाठी दि. ०२/०३/२०२४ रोजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह येथे कार्यशाळा आयोजित आयोजित करण्यात आली आहे.

तरी सदर कार्यशाळेस आपल्या अधिविभागातील २ मुले, २ मुली, १ शिक्षक/संपर्क अधिकारी याप्रमाणे एकूण ५ व्यक्तींना पाठवून देण्यात यावे. कार्यशाळेचे रजिस्टेशन दि. ०२/०३/२०२४ रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत होणार आहे व सकाळी १० नंतर कार्यशाळा चालू होईल. सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांची चहा, नाष्टा, भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यशाळेचे उपस्थिती प्रमाणपत्र हि देण्यात येणार आहे. तरी **आपल्या अधिविभागातील २ मुले, २ मुली, १ शिक्षक/संपर्क अधिकारी याप्रमाणे एकूण ५ व्यक्तींना पाठवून देण्यात यावे** हि विनंती.

संपर्क: श्री. अमोल कुलकर्णी – ९४२११२२६६२

कळावे,

आपला विश्वासु,

(डॉ. एस. एम. गायकवाड)
समन्वयक,
शिव सहायता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र